## निवडक



**कुस्के, खोतिगाव : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात काँग्रेस पदाधिकारी व ग्रामस्थ.**

### कुस्के, खोतिगाव येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा

*टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, दि. ७ :** आज काणकोण काँग्रेस कमिटी आणि युवक काँग्रेसतर्फे कुस्के–खोतीगाव, येथे वृक्षारोपण आणि रोपटी वाटप करून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटी महिला अध्यक्षा डॉ. प्रतिक्षा खलप, उत्तर आणि दक्षिण जिल्हा महिला अध्यक्षा मॉली आणि ममता, काणकोण महिला अध्यक्षा उर्सुला कोस्टा, युथ काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष महेश नाडर, प्रदेश युवा उपाध्यक्ष वैष्णव पेडणेकर, युथ ब्लॉक अध्यक्ष मनीष देसाई जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष विठोबा देसाई, साव्हियो डिसिल्वा, अध्यक्ष दक्षिण गोवा जिल्हा काँग्रेस कमिटी, दक्षिण गोवा जिल्हा सरचिटणीस गास्पर कुतीन्हो, आणि खोतिगाव माजी सरपंच दया गावकर आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना रोपट्यांचे मान्यवराहस्ते करण्यात आले.

---

### विवेकानंद केंद्र कन्याकुमारी तर्फे आज संस्कार वर्गांचे स्थान पूजन कार्यक्रम

*टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ७ :** विवेकानंद केंद्र कन्याकुमारी देशभरात विविध शाखांच्या माध्यमातून अनेक सेवा कार्य करीत असते. योग वर्ग, संस्कार वर्ग,केंद्र वर्ग व स्वाध्याय वर्ग या कार्यपद्धती चा उपयोग करून राष्ट्रनिर्माणात महत्त्वाची भूमिका बजावीत आहे.

या वर्षी संस्कार वर्ग हा महत्वाचा बिंदू घेऊन संपूर्ण महाराष्ट्र आणि गोवा राज्यात रविवार दि. ८ रोजी एकूण १५१ संस्कार वर्ग सुरू करीत आहे. या निमित्ताने सर्व संस्कार वर्गांचे स्थानपूजन रविवार दि. ८ रोजी होणार आहे. गोव्यात करंझोळ सत्तरी, शिवोली बार्देश, सालीगाव बार्देश व कवळे फोंडा या ठिकाणी स्थान पूजनाचे कार्यक्रम होणार आहे.

करंझोल सत्तरी येथील सातेरी मंदिर, शिवोली येथील श्री स्वामी समर्थ मंदिर,सालीगाव येथील लक्ष्मीनारायण मंदिर व कवळे येथील सरस्वती हायस्कुल मध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

करंझोल येथील कार्यक्रमाला महाराष्ट प्रांत संपर्क प्रमुख संजय कुलकर्णी व गोवा कार्यपद्धती प्रमुख पूजा बर्वे, शिवोली येथे महाराष्ट्र प्रांत कार्यपद्धती प्रमुख मदगोंडा पुजारी व गोवा संयोजक वल्लभ केळकर,सालीगाव येथे कोकण विभाग कार्यपद्धती प्रमुख सीमा नितसुरे व गोवा अमृत परिवार प्रमुख नरेंद्र जोशी तर कवळे येथील कार्यक्रमाला फोंडा विस्तार संचालक राजेंद्र बर्वे, तर म्हापसा–सिम येथे प्रांत कार्यपद्धती प्रमुख मदगोंडा पुजारी व गोवा संयोजक वल्लभ केळकर,उपस्थित राहणार आहेत.

एकाच दिवशी स्थान पूजन झाल्यानंतर आठवड्यातून एकदा सर्व ठिकाणी संस्कार वर्ग सुरू होणार आहेत.या वर्गात चौथी ते आठवीची मुलं सहभागी होऊ शकतात.या वर्गात मुलांना खेळ,गाणी स्तोत्रे,मनाचे श्लोक, गोष्टी, घोषणा, आज्ञा अभ्यास आदी शिकवले जाईल.

सध्याच्या बदलत्या काळात संस्कार वर्गांची नितांत गरज ओळखून जास्तीत जास्त ठिकाणी संस्कार वर्ग सुरू करण्याचा केंद्राचा प्रयत्न आहे.यासाठी पालकांनी मुलांना संस्कार वर्गात पाठवावे व या कार्यात सहभागी व्हावे.या कार्यकर्त्यांशी संपर्क साधून नोंदणी करता येईल करंझोल– रुपाली डोईफोडे–८२७५१४७१४४ ,शिवोली–पल्लवी मांद्रेकर– ९३५९६५७७३३, सालीगाव– नरेंद्र जोशी – ७०५७१५४९४६, म्हापसा सिम – करुणा म्हावलिंगकर– ९०२२४९४७१४, कवळे फोंडा–मृण्मई लाड–९००४१६६०३२.

---

### माजी खेळाडू सचित्रा सेनानायके मॅच फिक्सिंगमध्ये दोषी



**कोलंबो, दि. ७ :** श्रीलंकेचा माजी खेळाडू सचित्रा सेनानायके याला मॅच फिक्सिंगसाठी दोषी ठरवण्यात आले आहे. २020 मध्ये लंका प्रीमियर लीगमध्ये त्याने सहकारी खेळाडूला फिक्सिंगसाठी प्रलोभन दिल्याचा आरोप होता. याप्रकरणी त्याला अटक झाली होती, पण २०२३ मध्ये जामिनावर सुटका झाली. आता या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यावर सेनानायके मॅच फिक्सिंगमध्ये दोषी आढळला आहे.

श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू सचित्रा सेनानायके याच्यावर मॅच फिक्सिंगचे आरोप लागल्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरू होती. आता हंबनटोटा हायकोर्टाने त्याला मॅच फिक्सिंगमध्ये दोषी ठरवले आहे. लंका प्रीमियर लीगमध्ये त्याने एका सहकारी खेळाडूला फिक्सिंगसाठी प्रलोभन दिल्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सिद्ध झाला आहे.

अटॉर्नी जनरलच्या विभागाने सांगितले की, श्रीलंकेत अलीकडेच लागू झालेल्या भ्रष्टाचारविरोधी कायद्यांतर्गत राष्टीय स्तरावरील क्रिकेटपटूवर मॅच फिक्सिंगसाठीचा हा पहिलाच खटला आहे. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, सेनानायकेने कोलंबो किंग्सकडून खेळणाऱ्या थारिंदु रत्नायकेला फिक्सिंगची ऑफर दिली होती.

२०१४ साली श्रीलंकेने आयसीसी टी–२० विश्वचषक जिंकला तेव्हा त्या विजयी संघात सचित्रा सेनानायके यांचा समावेश होता. ४० वर्षीय सेनानायके यांनी २०१३ ते २०१६ या कालावधीत आंतरराष्टीय क्रिकेट खेळले. या काळात त्यांनी श्रीलंकेकडून ४९ एकदिवसीय आणि २४ टी–२० सामने खेळले. एकदिवसीय सामन्यांमध्ये त्यांनी ५३ विकेट्स घेतल्या, तर टी–२० मध्ये त्यांनी २५ विकेट्स आपल्या नावावर केल्या. तो आयपीएल स्पर्धेतही खेळला आहे. २०२३ च्या हंगामात तो केकेआर संघाचा सदस्य होता.

---

# आरसीबीवर पुढच्या आयपीएलसाठी बंदी?

## आरसीबीच्या मोठ्या व्यक्तीला अटक | कर्नाटक क्रिकेट असोसिएशनच्या दोन अधिकाऱ्यांचा राजीनामा

**मुंबई, दि. ७ :**

आरसीबीने १८ वर्षांत प्रथमच आयपीएलची ट्रॉफी जिंकली आणि त्यानंतर त्यांनी जोरदार सेलिब्रेशन केले. पण त्यानंतर चाहत्यांची जी चेंगराचेंगरी झाली त्यासाठी आरसीबीला दोषी धरण्यात आले आहे. कारण आरसीबीच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आता आरसीबीला आयपीएलधूनही बाहेर काढले जाऊ शकते, असे म्हटले जात आहे. पण बीसीसीआय असे करू शकते का, काय आहेत बीसीसीआयचे नियम, या सर्व गोष्टी आता समोर आल्या आहे.

आरसीबीच्या चाहत्यांच्या चेंगराचेंगरीनंतर कर्नाटक क्रिकेट असोसिएशनच्या दोन अधिकाऱ्यांनीही राजीनामा दिला आहे. या प्रकरणात अटकही करण्यात आली आहे. या सगळ्यात आरसीबी संघ अडकला आहे. कारण आरसीबीच्या एका मोठ्या व्यक्तीला अटकही झाली आहे, निखिल सोसले असेल त्याचे नाव आहे. या प्रकरणानंतर बीसीसीआय आयपीएल २०२६ मध्ये आरसीबीच्या सहभागाबाबत मोठा निर्णय घेऊ शकते, अशी माहित आता येत आहे.



आरसीबीच्या विजयाच्या परेडमध्ये इतक्या मोठ्या चुकीसाठी कोण जबाबदार आहे हे शोधण्यासाठी चौकशी सुरू आहे. अशा परिस्थितीत, बीसीसीआयसमोर एक मोठा प्रश्न आहे की, जर या चुकीत आरसीबी संघाचे नाव आले तर ते पुढे काय निर्णय घेईल. आयपीएलमधील सर्व फ्रँचायझी व्यावसायिक संस्था म्हणून काम करतात, परंतु त्यांचा सहभाग बीसीसीआयच्या करारांद्वारे नियंत्रित केला जातो आणि त्या करारांमध्ये सार्वजनिक सुरक्षेपासून ते सार्वजनिक सुरक्षेपर्यंत अनेक कलम समाविष्ट आहेत. जर या चौकशीनंतर आलेल्या अहवालात आरसीबी व्यवस्थापनाला या गंभीर निष्काळजीपणाशी थेट जोडले, तर बीसीसीआयला न्याय देण्यासाठी आणि लीगची विश्वासार्हता राखण्यासाठी आरसीबीविरुद्ध मोठी कारवाई करावी लागू शकते. त्यामुळे आरसीबीवर बीसीसीआय कारवाी करू शकते, हे स्पष्ट होत आहे.

आरसीबीच्या संघाने ऐनवेळी काही गोष्टी ठरवल्या आणि त्यामुळेच ही चेंगराचेंडगरी झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आरसीबीच्या चाहत्यांच्या चेंगराचेंदगरीला तेच जबाबदार धरले जात आहेत. पण आता चौकशीमधून नेमकी कोणती गोष्ट समोर येत आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

### चेंगराचेंगरी प्रकरणी विराट कोहलीवरही गुन्हा दाखल

**बंगळुरूमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयी परेड दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणात स्टार खेळाडू विराट कोहली विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते एच.एम. वेंकटेश यांनी क्रिकेटपटू विराट कोहलीविरुद्ध बेंगळुरूमधील क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणात आधीच गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू आहे. त्याच प्रकरणाच्या चौकशीत वेंकटेश यांची तक्रार समाविष्ट केली जाईल. बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणी पोलिसांनी आज, शुक्रवारी रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरूचे (आरसीबी) मार्केटिंग प्रमुख निखिल सोसाळे याच्यासह अन्य तिघांना अटक केली. ते इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए नेटवर्क्सशी संबंधित आहेत. कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए)चे सचिव शंकर आणि कोषाध्यक्ष जयराम यांच्याही घरी पोलिसांनी धडक दिली.**

---



## नॉर्वे बुद्धिबळ २०२५ : मॅग्नस कार्लसनने जिंकले विजेतपद!

**अस्लो, दि. ७ :**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेला आणि पाच वेळा विश्वविजेता असलेला मॅग्नस कार्लसनने शुक्रवारी स्टॅव्हेंजर येथे झालेल्या नॉर्वे बुद्धिबळ २०२५ स्पर्धेत विद्यमान विश्वविजेता डी. गुकेश आणि फॅबियानो कारुआना यांना मागे टाकत विजय मिळवला. नॉर्वे बुद्धिबळाच्या अंतिम फेरीत, स्पर्धेत आघाडीवर असलेल्या कार्लसनला मागे टाकण्याच्या टार्गेटमध्ये, गुकेशने कारुआनाविरुद्ध एक चूक केली ज्यामुळे तो कार्लसन आणि अमेरिकन कारुआना यांच्या मागे तिसऱ्या स्थानावर राहिला. कार्लसन १० फेऱ्यांमध्ये १६ गुणांसह अव्वल स्थानावर राहिला, कारुआन १५.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला तर गुकेश १४.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिला.

विजयानंतर कार्लसन काय म्हणाला?

विजयानंतर कार्लसन म्हणाला, अशा दिवसानंतर आणि अशा स्पर्धेनंतर हा खूप मोठा दिलासा आहे.

**भारताच्या गुकेशला तिसऱ्या स्थानावरच मानावं लागले समाधान**

शेवटी माझे संघर्ष सार्थकी लागले. मी शेवटपर्यंत लढलो, मी यामुळे आनंदी आहे. तो क्लासिकल बुद्धिबळ खेळत राहील का? असे त्याला विचारले तेव्हा कार्लसन म्हणाला: नक्कीच जास्त नाही. मी असे म्हणणार नाही की ही स्पर्धा माझी शेवटची स्पर्धा होती. मला बुद्धिबळाचे इतर प्रकार जास्त आवडतात.

**कसा रंगला अंतिम सामना?**

अर्जुन एरिगाइसी विरुद्धच्या अंतिम सामन्यात, जागतिक क्रमवारीत नंबर वन असलेल्या बुद्धिबळपटू कार्लसनचे १५ गुण होते तर गुकेश १४.५गुण होते. कार्लसनपासून गुकेश फक्त अर्धा गुण मागे होता. गुकेश १२.५ गुणांसह जेतेपदाच्या शर्यतीत असलेल्या कारुआनाविरुद्ध खेळत होता. एका चुकीसोबत गुकेशने त्याचा सामना गमावला. जेतेपदाच्या शर्यतीत चौथा खेळाडू १३ गुणांसह हिकारू नाकामुरा होता.

---

## केएल राहुलचे खणखणीत शतक

### इंग्लंड विरूद्धच्या सीरिजमध्ये ओपनिंगसाठी दावा मजबूत

**नवी दिल्ली, दि. ७ :**

इंग्लंड विरूद्धच्या कसोटी मालिकेला २० जूनपासून सुरुवात होणार आहे. त्याआधी टीम इंडिया चाहत्यांसाठी इंग्लंडमधून आनंदाची बातमी समोर आली आहे. टीम इंडियाचा अनुभवी विकेटकीपर फलंदाज केएल राहुल याने इंग्लंडमध्ये धमाकेदार शतक झळकावत कसोटी मालिकेत यशस्वी जयस्वाल याच्यासह ओपनिंगसाठी दावा ठोकला आहे. रोहित शर्मा याच्या निवृत्तीनंतर इंग्लंड दौऱ्यात यशस्वीसह ओपनिंग कोण करणार? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. मात्र केएलने एका खेळीतच टीम मॅनेजमेंटची डोकेदुखी कमी केलीय.

इंग्लंड लायन्स विरुद्ध टीम इंडिया ए यांच्यात काउंटी ग्राउंड, नॉर्थम्पटन येथे दुसरी अनऑफीशियल टेस्ट मॅच खेळवण्यात येत आहे. केएलने या सामन्यातील पहिल्याच दिवशी खणखणीत शतक झळकावले. आयपीएलच्या १८ व्या मोसमात केएलने दमदार कामगिरी केली. केएलने त्याच जोराने इंग्लंडमध्ये येत शतक ठोकले आणि अप्रतिम सुरुवात केली. केएलला सर्फराज खान याच्या जागी प्लेइंग ईलेव्हनमध्ये संधी देण्यात आली.



केएलने या संधीचे सोने केले आणि निवड समितीचा निर्णय योग्य ठरवून दाखवला.

**केएलचे १८ वे शतक**

केएल राहुलने १०२ बॉलमध्ये अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर केएलने टॉप गिअर टाकला. केएलने पुढील ५० धावा या फक्त ४९ चेंडूत पूर्ण केल्या. केएलने १५१ चेंडूत १३ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने शतक पूर्ण केलं. केएलच्या फर्स्ट क्लास क्रिकेट कारकीर्दीतील हे १८ वे शतक ठरले. केएलला आणखी मोठी खेळी करण्याची संधी होती. मात्र केएल शतकानंतर थोड्या धावा करुन आऊट झाला. केएलने १६८ बॉलमध्ये १५ फोर आणि १ सिक्सच्या मदतीने ११६ रन्स केल्या.

**चौथ्या विकेटसाठी शतकी भागीदारी**

इंग्लंड लायन्सने टॉस जिंकून इंडिया एला बॅटिंगसाठी भाग पाडंले. इंडियाची निराशाजनक सुरुवात राहिली. यशस्वी जयस्वाल १७ आणि कर्णधार अभिमन्यू ईश्वरन ११ रन्स करुन आऊट झाले. त्यामुळे २ आऊट ४० अशी स्थिती झाली. त्यानंतर केएल आणि करुण नायर या दोघांनी डाव सावरला. तिसऱ्या विकेटसाठी केएल आणि करुण जोडीने ८६ धावांची भागीदारी केली. त्यानंतर करुण नायर ४० रन्सवर आऊट झाला.

करुणनंर ध्रुव जुरेल मैदानात आला. केएल आणि ध्रुव या दोघांनी चौथ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. या दोघांनी १२१ धावा जोडल्या. त्यानंतर ध्रुव आऊट झाला. ध्रुवने ८७ बॉलमध्ये ७ फोरसह ५२ रन्स केल्या. ध्रुव आऊट झाल्यानंतर केएलही आऊट झाला. त्यामुळे इंडिया ए टीमचा स्कोअर ५ आऊट २५२ असा झाला. आता उर्वरित ५ फलंदाज किती धावांपर्यंत पोहचवतात? याकडे चाहत्यांचं लक्ष असणार आहे.

**केएल राहुलकडून इंग्लंड दौऱ्याची शतकाने सुरुवात**

इंडिया ए प्लेइंग ईलेव्हन : यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, अभिमन्यु ईश्वरन (कर्णधार), करुण नायर, ध्रुव जुरेल (विकेटकीपर), नीतीश कुमार रेड्डी, शार्दूल ठाकुर, तनुष कोटीयन, अंशुल कंबोज, तुषार देशपांडे आणि खलील अहमद.

---

## नेशन्स लीग फायनलमध्ये 'लामिन यामलचा दिग्गज' रोनाल्डोशी सामना

**स्टुटगार्ट, दि. ७ :**

नेशन्स लीगच्या अंतिम फेरीत स्पेनचा युवा स्टार लामिन यामल पहिल्यांदाच फुटबॉलमधील जिवंत दंतकथा क्रिस्टियानो रोनाल्डोविरुद्ध मैदानावर उतरणार आहे. रविवारी होणाऱ्या या निर्णायक सामन्यात २०२१ चा विजेता स्पेन आणि २०१९ मधील चॅम्पियन पोर्तुगाल यांच्यात थेट लढत रंगणार आहे.

१७ वर्षीय यामलने गुरुवारी झालेल्या उपांत्य फेरीत फ्रान्सविरुद्ध चमकदार कामगिरी करत दोन शानदार गोल केले आणि सामनावीर ठरला. स्टुटगार्टमध्ये रंगलेल्या या सामन्यात स्पेनने फ्रान्सचा ५–४ असा पराभव केला. पहिल्या अर्ध्यात स्पेनने एकतर्फी वर्चस्व गाजवले होते, आणि नंतर काही प्रमाणात सैलावले तरी विजय त्यांच्या खिशात टाकला.

हा माझ्यासाठी एक खास सामना आहे, यामलने पत्रकारांशी बोलताना सांगितले. मला या सामन्यात माझी



ओळख सिद्ध करायची आहे असे तो आत्मविश्वासाने म्हणाला.

स्पेनचा हा गुणवान खेळाडू आता ४० वर्षीय रोनाल्डोशी आमने–सामने येणार आहे, जो त्याच्यापेक्षा तब्बल २३ वर्षांनी मोठा आहे. यामल म्हणाला, ख्रिस्तियानो रोनाल्डो हा एक फुटबॉल दिग्गज आहे. माझ्यासारख्या सर्व तरुण खेळाडूंना त्याच्याबद्दल आदर वाटतो. पण मैदानात माझं लक्ष फक्त स्पेनला विजय मिळवून देण्यावर असेल.

स्पेनच्या मुख्य प्रशिक्षक लुईस दे ला फुएंटे यांनीही सामन्याचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की , रविवारी दोन शक्तिशाली संघ आमनेसामने येणार आहेत. हा सामना विश्वचषकाच्या अंतिम फेरीच्या दर्जाचा असू शकतो. आम्ही एका महान खेळाडूविरुद्ध खेळणार आहोत. ख्रिस्तियानो रोनाल्डो. त्याचं नावच एक प्रेरणा आहे. त्याच्या वयातही त्याची तंदुरुस्ती आणि कामगिरी ही वाखाणण्याजोगी आहे.

गुरुवारी स्पेनकडून गोल करणारा मिकेल मेरिनोही आत्मविश्वासात भरलेला दिसला. हा आमचा पहिलाच अंतिम सामना नाही, तो म्हणाला. म्युनिकमधील युरो २०२४ मधील आमचा अनुभव आमच्या पाठीशी आहे. पुन्हा एकदा अंतिम सामन्यात पोहोचणे हे मोठं यश आहे. आता आम्ही जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू.

स्पेनच्या यशात यामल आणि निको विल्यम्स यांचे योगदान निर्णायक ठरत आहे. गुरुवारी सामन्यात विल्यम्सने एक गोल करताना दुसऱ्या गोलासाठीही मदत केली होती. युरो २०२४च्या अंतिम फेरीत इंग्लंडविरुद्ध सामनावीर ठरलेला विल्यम्स आता पुन्हा एकदा निर्णायक ठरण्याच्या तयारीत आहे. रविवारी होणारा हा अंतिम सामना केवळ स्पर्धेच्या विजेतपदासाठी नसून, जुन्या आणि नव्या पिढीतील महान खेळाडूंमधील संघर्ष म्हणूनही पाहिला जात आहे. फुटबॉलप्रेमींसाठी हा सामना केवळ एक खेळ नव्हे, तर एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.

---

## २५ वे ग्रँड स्लॅम जिंकण्याचे जोकोविचचे स्वप्न भंगले


**पॅरीस, दि. ७ :**

फ्रेंच ओपन २०२५ च्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत नोवाक जोकोविचचा यानिक सिनरने पराभव केला. उपांत्य फेरीत जोकोविच पूर्णपणे लयीत नसल्याचे दिसून आले आणि तो प्रतिस्पर्ध्याला आव्हान देऊ शकला नाही. या पराभवामुळे, फ्रेंच ओपन २०२५ चे विजेतपद जिंकण्याचे त्याचे स्वप्न भंगले आणि सिनरने अंतिम फेरीत प्रवेश केला, जिथे त्याचा सामना उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या कार्लोस अल्काराझशी होईल.

नोवाक जोकोविचने सेमीफायनलचा पहिला सेट ६–४ ने गमावला. त्यानंतर, त्याने दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु यानिक सिनरने सेट ७–५ ने जिंकला.

डब्ज ठएऊ खपवेपशीळर जशिप २०२५: इंडोनेशिया ओपन २०२५ च्या प्री–क्वार्टर फायनलमध्ये पीव्ही सिंधूचा पराभव

यानंतर, तिसऱ्या सेटमध्ये सामना टायब्रेकरमध्ये गेला. येथेही



जोकोविच ७–६ (७–३) ने हरला. सेटसोबतच, तो सामनाही गमावला. टायब्रेकरमध्ये, जो खेळाडू प्रथम ७ गुणांपर्यंत पोहोचतो तो सेट जिंकतो.

डब्ज ठएऊ भारताच्या किदाम्बी श्रीकांतचा मलेशिया मास्टर्सच्या अंतिम फेरीत पराभव

नोवाक जोकोविच हा पुरुष एकेरीत सर्वाधिक २४ ग्रँड स्लॅम जिंकणारा खेळाडू आहे. पण फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत तो सिनेरच्या अचूकतेचा आणि वेगवान फोरहँडचा सामना करू शकला नाही.आला त्याला पराभवाला सामोरी जावे लागले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २७६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 276 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .